# स्त्री भ्रुण हत्येचे सामाजिक परिणाम

भारतात होत असलेली आधुनिक क्रांती आपल्या देशातील एका जुन्या प्रश्नाला एक नवीन वळण देत आहे ते म्हणजे मुलांचा अट्टाहास धरणाऱ्या व्यक्तींद्वारे होत असलेली गर्भलिंग चाचणी व त्यावर आधारीत भ्रूणहत्या होय.

आधुनिक विज्ञानामुळे गर्भलिंग चाचणी करणे अतिशय सोपे झाले असून आता अशा चाचण्या करुन घेणे ही अतिशय सामान्य गोष्ट झाली आहे. स्त्री लिंगी गर्भाचे गर्भपाताचे प्रमाण अतिशय भयानकरित्या वाढत चाललेले आहे त्यामुळे मुलींच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे.

भारतीय समाजात गेल्या ५००० वर्षापासून पुत्रलालसा आहे. लोकांच्या मनात स्त्री-पुरुष विषमता पुर्वापार आहे पण १९७० च्या दशकात जे नव तंत्रज्ञान आलं त्यामुळे प्रभावीपणे पुत्रलालसा पुर्ण करणे शक्य झाले आहे. हे तंत्रज्ञान खुप मोठ्या प्रमाणावर लोकांना उपलब्ध झाले. सुरुवातीला महाग असणारे हे तत्रंज्ञान कालांतराने सहज परवडण्याजोग्या पैशात सर्वांना उपलब्ध होऊ लागले आणि लाखोंच्या संख्येने मुलींचे गर्भ पाडण्यात आले. त्यामुळे जनगणनेतही प्रचंड घट निदर्शनास आली. यामध्ये तीन गोष्टी एकत्रित आल्या एक म्हणजे पुर्वापार असलेली लिंग भेदावर आधारीत विषमता दुसरे म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान आणि तिसरे म्हणजे नफेखोरी या तीन गोष्टींची सांगड झाल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर लिंग गुणोत्तरात घट झालेली दिसते.

विज्ञानाने सोनोग्राफीचा लावलेला शोध माता व जन्माला येणाऱ्या बाळाच्या आरोग्य रक्षणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. कारण बाळामध्ये जन्मतःच आलेले आनुवांशिक रोग, मज्जासंस्थेचे विकार, मतिमंद मुलाच्या बाबतीत पूर्वसूचना व बाळाची गर्भातील सुव्यवस्थित वाढ सोनोग्राफीमुळेच कळते. परंतु सोनोग्राफी या तंत्राचा वापर वरील परिक्षणासाठी न करता लिंगनिदानासाठी करुन स्त्री भ्रुणांची हत्या करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतीय कुटुंबामध्ये मुलांचे ज्याप्रमाणे स्वागत होते त्याप्रमाणे मुलींचे होत नाही आणि त्याचा परिणाम गर्भलिंग परीक्षा करण्यावर होतो. वास्तविक गर्भलिंग निदान करणे हा कायद्याने गुन्हा आहे. प्रसवपुर्व निदान तंत्राच्या दुरुपयोगाला आळा घालून स्त्री लिंगी गर्भाची हत्या थांबविण्यासाठी केंद्र शासनाने २० सप्टेंबर १९९४ पासून प्रसवपुर्व निदानतंत्र हा कायदा मंजुर केला आहे. सन २००३ मध्ये या कायद्यात सुधारणा केली असून त्याचे नामांतर गर्भधारणापुर्व व प्रसवपुर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम असे केले आहे. महाराष्ट्राने हा कायदा १९८८ सालीच लागू केला आहे. अशा प्रकारे कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे तरीही सन २०११ च्या जनगणनेनुसार

महाराष्ट्रात १००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९२५ इतके कमी झाले आहे. यामुळे भविष्यात सामाजिक अडचणी निर्माण होणार आहेत. यासाठी गर्भातील प्रत्येक मुलगी वा जीव सुरक्षित करण्याच्या दृष्टीने तसेच मुलगा व मुलगी समान समजण्याच्या दृष्टीने समाज जागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. या सर्व बाबीचा भीषण परिणाम समाजावर होतो आहे. म्हणून वरील बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन **'स्त्री भ्रुण हत्येचे सामाजिक परिणाम'** या विषयावर संशोधन करण्याची निकड भासली.

**अध्ययनाचे उद्दिष्ट पुढील प्रमाणे आहे.**

१. स्त्री-भ्रुण हत्येची कारणे जाणून घेणे.

२. लिंग-गुणोत्तर जाणून घेणे.

३. मुलीच्या जन्मासंबंधी महिलांचे मत जाणून घेणे.

४. गर्भपातासंबंधी महिलांचे मत जाणून घेणे.

५. स्त्री-भ्रुण हत्येमुळे होणारे सामाजिक परिणाम अभ्यासणे.

६. स्त्री-भ्रुण हत्या होऊ नये म्हणून उपाय सुचविणे.

**अध्ययन क्षेत्र :**

प्रस्तुत अध्ययनासाठी वर्धा शहर वर्धा तालुक्यातील लगतच्या ग्रामीण भाग अध्ययन क्षेत्र म्हणून निवडण्यात आले.

वर्धा जिल्ह्यास गांधीजींच्या विचारांचे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरीत होऊन इथे आंबेडकरी चळवळ रुजलेली आहे. इथे चालणाऱ्या व्याख्यानमाला, सामाजिक कार्यक्रमांमधून सुधारणावादी प्रबोधन होते. अलिकडे वर्धा हे उच्चशिक्षणाचे केंद्र बनत आहे. वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणाची सोय येथे उपलब्ध असून वैद्यकीय महाविद्यालयांद्वारा दर्जेदार सुविधा ग्रामीण व नागरी जनतेला पुरविल्या जातात.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनात स्त्री भ्रुण हत्येचे सामाजिक परिणाम या विषयाचे अध्ययन करण्याकरीता वर्धा शहरातील १०० स्त्रियांची निवड नमुना पध्दतीने करण्यात आली.

स्त्री भ्रुण हत्येचे सामाजिक परिणामांचा अभ्यास करतांना शहरी स्त्रिया व ग्रामीण भागातील स्त्रियांचे मत लक्षात घेण्यासाठी वर्धा तालुक्यातील दहा गावे नमुना पध्दतीने निवडण्यात आली व प्रत्येक गावातील १० स्त्रियांचा सर्व्हेक्षणात समोवश करण्यात आला. म्हणजे ग्रामीण भागातील एकूण १०० स्त्रियांचा समावेश करण्यात आला.

वर्धा तालुक्यातील वर्धा लगतचे १० गावांचा सर्वेक्षण करण्यासाठी निवड करण्यात आली.

१) नालवाडी २) साटोडा ३) आलोडी ४) कारला ५) पिपरी (मेघे)

६) आंजी ७) पवनार ८) वरुड९) बोरगाव (मेघे)

अध्ययनाचा विषय हा स्त्रियांच्या जीवनाशी निगडीत असल्यामुळे संशोधनकर्तीने प्रत्यक्ष मुलाखती घेण्याचे ठरविले. मुलाखतीसाठी संरचित मुलाखत अनुसूचिचा वापर करण्यात आला. त्यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये जाऊन वास्तविक तथ्ये गोळा करणे शक्य झाले.

तथ्य संकलनातील एक भाग म्हणून आंजी ता. जि. वर्धा येथे स्त्री भ्रूण हत्त्येची कारण मिमांसा करण्याच्या दृष्टीने महिलांची कार्यशाळा घेण्यात आली. ही कार्यशाळा स्थानिक महिला मंडळाच्या श्रीमती भारती गोमासे यांच्या मदतीने संपन्न झाली. या कार्यशाळेत ७० महिला वेगवेगळ्या वयोगटातील सहभागी झाल्या. लिंगभाव असमानता त्याचे कौटुंबिक परिणाम आणि स्त्रीभ्रूण हत्त्येचा त्यांच्याशी असणारा संबंध इ. गोष्टी या कार्यशाळेतून चर्चा करण्यात आली.

**अध्ययनातील प्रमुख शोध**

मुलगा हवा आणि त्याचबरोबर मुलगी नको ही मानसिकता आपल्या देशात समाजातील काही गटांमध्ये इतकी रुजलेली आहे की, राजस्थान व तामिळनाडूमध्ये नवजात मुलींना अघोरी मार्गाने मारुन टाकण्याचे प्रकार आपण गेली कित्येक वर्ष ऐकत आलो आहे. परंतु हे प्रकार काही विशिष्ट भागात व समाज गटात होत असल्याकारणाने या समस्येला सार्वत्रिक स्वरुप प्राप्त झाले नव्हते.

अशी मानसिकता असली तरी ती प्रत्यक्षात मुलींच्या प्रमाणावर परिणाम करीत नसल्याने या पुत्रलालसेचे गांभीर्य पुरतेपणी लक्षात येत नव्हते. कुटुंबातील अपत्यांच्या संख्येवर जेव्हा काही मर्यादा नव्हती त्यावेळी मुलगे / मुली यांच्यातील समतोल आपसूकच साधला जाई. परंतु जसजसा कुटुंबाचा आकार लहान होऊ लागला तसतसा या पुत्रलालसेचा परिणाम दिसू लागला. जी राज्ये जनन-संक्रमणाच्या मधल्या टप्प्यावर होती तिथे मुलगा हवा मानसिकतेमुळे कुटुंब नियोजनाच्या स्वीकृतीवर आणि त्यामुळे जननदराच्या घटीवर परिणाम होऊ लागला. जननसंक्रमण धीम्या गतीने होऊ लागले उदा. महाराष्ट्रात हे संक्रमण धीमे झाले असल्याचे कारण पुत्रलालसा होते. पुत्रलालसा आजही आहे व आता महाराष्ट्राने जननसंक्रमण जवळपास पुरे केले आहे. गेल्या २० एक वर्षात या पुत्रलालसेने अतिशय आक्रमक रुप धारण केले आहे आणि नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे तिने मुलींच्या जन्मावरच घाला घातला आहे.

मुलगी नको मुलगा हवा कारण मुलगा म्हणजे म्हातारणाची काठी, वंशाचा दिवा, कुटुंबाचा आधार आणि खरा वारसदार, मृत्यूनंतर वडिलांना अग्नी देऊन मुक्ती देणारा म्हणजे जमेचीच बाजू आणि मुलगी म्हणजे गळ्यातील धोंड, डोक्यावर सतत टांगती तलवार, परक्याचे धन आणि एकूणच

लग्न, हुंडा या स्वरुपात खर्चाचीच बाजू ही भारतीय समाजाची मानसिकता अनेक शतकांपासून आहे तशीच आहे. आजच्या आधुनिक समाजात २१ व्या शतकातही त्यात तिळमात्र फरक झालेला नाही. विज्ञानातील अनेक संशोधनांनी मानवाला खुप सुख सूविधा मिळवून दिल्या आहेत. तसेच वैद्यक शास्त्रातील प्रगतीमुळे अनेक रोगांवर मानवाने मात केली. असंख्य रोग्यांचे शारीरिक दु:ख कमी केले. त्याचबरोबर मानवाने गर्भपातासारखे स्वत:चाच संहार करणारे शोध वैद्यक शास्त्रात लावले. वैद्यक शास्त्रातील प्रगतीमुळे गर्भजल परिक्षणाच्या तंत्रज्ञानाचा विकास झाला. तो गर्भातील विकृती किंवा विकारांची योग्यवेळी माहिती व्हावी आणि त्यावर उपाययोजना करता यावी यासाठी. गर्भजल परीक्षा तंत्रज्ञान हे वैद्यक शास्त्रामध्ये एकाअर्थाने क्रांतीकारी ठरले परंतु या तंत्रज्ञानाचा वापर जगभरात अत्यंत चुकीच्या कारणासाठी आणि गैरमार्गाने होऊ लागला. मुलीचा गर्भ असल्याचे स्पष्ट झाल्यावर गर्भपात करण्याचे प्रमाण वाढत चालले. त्यामुळे स्त्री-पुरुष संख्येच्या प्रमाणाचा तोल बिघडला. भारतासारख्या अनेक जुनाट रुढींनी ग्रस्त असलेल्या समाजात या तंत्रज्ञानाचा उपयोग झाला नसता तर नवलच.

वर्धा जिल्ह्यातील स्थिती लक्षात घेतली असता बाललिंग गुणोत्तराचे प्रमाण घटलेले दिसते. या पार्श्वभूमीवर स्त्री भ्रूण हत्येची कारणे व परिणाम या विषयाच्या अनुषंगाने महिलांच्या मतांच्या अध्ययनातून पुढे आलेले निष्कर्ष सारांश रुपाने पुढील प्रमाणे मांडले आहेत.

**उत्तरदात्याची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी :**

या अध्यनातील उत्तरदाते ह्या स्त्रिया असून वर्धा शहर व आसपासच्या ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या आहेत.

- **वय :** संपूर्ण उत्तदात्यांच्या वयाचे अध्ययन करता असे दिसते की, साधारणत: ३० ते ५० वर्षे या वयोगटातील उत्तरदात्यांची संख्या ग्रामीण (६२%) व शहरी (७५%) ही जास्त आहेत.
- **शिक्षण :** ९४% उत्तरदाते हे शिक्षित आहेत त्यापैकी १० वी च्या पुढे शिक्षण घेतलेले उत्तरदाते ग्रामीण क्षेत्रात ५२% व शहरी क्षेत्रात ५५% आहे.
- **कुटुंबाचा प्रकार :** विभक्त कुटुंब प्रणालीमध्ये राहणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ५८.५% आहे तर ४१.५% संयुक्त कुटुंबात वास्तव्य करणारे आहेत. संयुक्त कुटुंबांची संख्या ग्रामीण भागात ५३% आहे व शहरी भागात विभक्त कुटुंबाचे प्रचलन ७०% आहे.
- **कुटुंब सदस्य संख्या :** कुटुंबातील सरासरी सदस्य संख्या ४ ते ६ आहे.

- **मुलामुलींची संख्या :** एक मुलगा असणाऱ्या कुटुंबाची संख्या ५४.५% आहे तर अनुक्रमे दोन व तीन मुलगे असणारे उत्तरदाते २२.५% व ०२ टक्के आहेत. कुटुंबातील मुलींची संख्या लक्षात घेता एक किंवा दोन मुली असणाऱ्या कुटुंबाची संख्या अनुक्रमे ४४.५% व २४% आहे.
- **उत्तरदात्यांचा व्यवसाय आणि मासिक उत्पन्न :** उत्तरदात्यामध्ये ७१% उत्तरदात्या ह्या गृहीणी आहेत. नोकरी करणाऱ्यांची संख्या ही २०% आहे तर मजुरीची कामे करणाऱ्या ४% आहेत. ५% महिला स्वंयरोजगार / घरगुती उद्योग करणाऱ्या आहेत.
- **कुटुंबाचे मासिक उत्पन्न :** कुटुंबाच्या उत्पन्नाचा विचार करता अधिकाधिक (५३%) उत्तरदाते हे १०००० ते ३०००० रु. या उत्पन्न गटातील आहेत.
- **स्त्री भ्रुण हत्येचे कारणे :**
- **अ) कौटुंबिक कारणे :** स्त्री भ्रुण हत्येला जबाबदार असणाऱ्या कारणांमध्ये सगळ्यात महत्वाची कारणे म्हणजे मुलगा होणे हा कुटुंबाच्या प्रतिष्ठेचा व मोक्षप्राप्तीचा मार्ग ही धारणा आहे असे मत ५२% उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे. ग्रामीण ६६% व शहरी ३८% उत्तरदात्यांच्या मतात तफावत दिसते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा ही पुरुषसत्ताक मानसिकता भ्रुण हत्येला कारणीभूत असल्याचे मत ४९.५% उत्तरदात्यांनी व्यक्त केले.
- **ब) आर्थिक कारणे :** आर्थिक कारणांमागील दोन महत्वाची कारणे स्पष्ट होतात. मुलांमुळे कुटुंबातील पैसा, उद्योग, शेती, घर, संपत्ती कुटुंबातच राहत. या विधानाशी सहमती ६३% उत्तरदात्यांनी दर्शविली आहे. ग्रामीण भागातील ७४% उत्तरदात्यांनी हे मत नोंदविले आहे तर ५२% उत्तरदाते या विधानाशी सहमत वाटते.
- **क) सामाजिक कारणे :** प्रत्येक समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आल्याचे दिसते. या दुय्यमस्थानामुळे स्त्रीभ्रुण हत्या घडून येतात या मताशी एकूण उत्तरदात्यांपैकी ४९.५% सहमत आहेत. या दुय्यमत्वामुळे मुलींना परक्याचे धन म्हणून हिनवले जाते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर तसेच इतर बाबींवर खर्च करणे हे व्यर्थ आहे. ही भावना जोपासली जाते. हे भ्रुणहत्येसाठी महत्वाचे कारण आहे. एकूण ४३.५% उत्तरदाते या मताशी सहमत आहेत.
- **ड) भावनिक कारणे :** मुलांमुळे भावनिक आधार मिळतो या मताशी २३% उत्तरदाते सहमत आहेत. मुले ही म्हातारपणाची काठी अर्थात आधार असतात असे मत ७९.५% उत्तरदात्यांचे आहे. यात ८६% ग्रामीण व ७३% शहरी उत्तरदात्यांचे ही मत असेच आहे.

- **इ) भ्रुणहत्येची इतर कारणे :** सोनोग्राफी तंत्राचा सुळसुळाट झाल्यामुळे व असे सेंटर मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे भ्रुणहत्येचे प्रमाण वाढले आहे असे मत ३०.५% उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे. डॉक्टर आपली नैतिकता विसरुन अधिक पैसा कमविण्याच्या लालसेपायी सोनोग्राफी तंत्राचा गैरवापर करतात. गर्भाचे लिंगनिदान करुन भ्रुणहत्येस सहकार्य करतात या मताशी ४२% उत्तरदाते सहमत आहेत. यात ग्रामीण ४३% व शहरी ४१% उत्तरदात्यांचे प्रमाण आहे.
- **आदर्श कुटुंबात मुलामुलींचे गुणोत्तर :** ३८.५% उत्तदात्यांना १ मुलगा व १ मुलगी हे कुटुंबातील मुला-मुलींचे आदर्श प्रमाण वाटते. म्हणजेच या उत्तरदात्यांच्या मते मुलगा असणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील उत्तरदात्यांमध्ये हे प्रमाण ४४% शहरी भागातील उत्तरदात्यांच्या तुलनेत ३३% अधिक दिसते.
- **मुलीच्या जन्माबद्दल महिलांचे मत :** , ५३.५% उत्तरदात्यांच्या मते मुलीचा जन्म आनंददायी मानला जात नाही. ग्रामीण व शहरी उत्तरदात्यांमध्ये तुलना केल्यास असे दिसते की मुलीच्या ग्रामीण भागातील ६७% उत्तरदात्यांच्या मते दुखःद मानले जाते.
- **मुलींच्या जन्मानंतरची आईची प्रतिक्रिया :** पहिल्या मुलींच्या जन्माचा अतिशय आनंद ५७.५% उत्तरदात्यांना झालेला आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण ६०% तर शहरी भागात थोडे कमी म्हणजेच ५५% आहे. तर समाधानकारक प्रतिक्रिया ३२% उत्तरदात्यांची आहे. पहिल्या मुलींच्या जन्माचे दु:ख ४% च उत्तदात्यांना झाल्याचे दिसते. पहिल्या मुलीच्या जन्माचे दु:ख झाल्याचे केवळ ४% उत्तरदाते सांगतात पण दुसरी मुलगी झाल्याचे दु:ख झाले हे सांगणारे २३.५% आहेत.
- **मुलीच्या जन्मानंतर कुटुंबातील सदस्यांची प्रतिक्रिया :** पहिल्या मुलीच्या जन्माच्यावेळी कुटुंबातील सदस्य आनंदी असण्याचे प्रमाण केवळ २२.५% आहे. दुसऱ्या मुलीच्या जन्माचा आनंद साजरे करणारे कुटुंबीय फारच कमी म्हणजे ५% आहेत. दुसऱ्या मुलीच्या जन्माने दु:खी होणाऱ्या कुटुंबीयाच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली दिसून येते व हे प्रमाण ४४.५% आहे.
- **मुलीच्या जन्मानंतर येणाऱ्या अडचणी :** मुलीच्या जन्मानंतर येणाऱ्या अडचणींमध्ये सगळयात महत्वाचा मुद्दा ज्यावर ७१% उत्तरदात्यांनी सहमती दर्शविली आहे. ज्यात ७६% ग्रामीण व ६६% शहरी उत्तरदात्यांचे प्रमाण आहे. ते म्हणजे मुलींच्या जन्मामुळे जन्मदात्रीला अर्थात आईचा होणारा छळ होय.

- **समाजात मुला-मुलींमधील भेदभाव :** ग्रामीण भागातील ८४% व शहरी भागातील ७०% एकंदरीत ७७% उत्तरदात्यांच्या मते असा भेदभाव समाजामध्ये दिसून येतो.
- **गर्भलिंग चाचणीसंबधी मत :** गर्भलिंग तपासणीची माहिती ८६.५% उत्तरदात्यांना नाही आहे. शहरी भागात हे प्रमाण ९०% आहे तर ग्रामीण भागात ८३% आहे यावरुन असे दिसते की, गर्भलिंग तपासणी केली जाऊ शकते याबाबतीत ग्रामीण व शहरी उत्तदात्यांना माहिती आहे. ४६.५% उत्तरदात्यांच्या मते माहितीचा मुख्य स्त्रोत डॉक्टर्स आहेत.
- **गर्भपातासंबंधी महिलांचे मत :** पहिला मुलगाच असावा का याबाबतच्या मताला केवळ ३१.५% उत्तरदात्यांनीच याबाबत होकार दिला आहे तर ६७.५% उत्तरदाते मात्र पहिला मुलगाच असावा या मताशी सहमत नाहीत तर मुलगा किंवा मुलगी असे कोणतेही अपत्य चालेल
- **गर्भपात योग्य-अयोग्य बाबत मत :** मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात करणे उचित नाही. याची कारणे स्पष्ट करतांना चार महत्वाची कारणे दिसून येतात. गर्भपात करणे पाप आहे २९%, परमेश्वराने जे दिले ते स्वीकारावे २७%, गर्भपात निसर्गाच्या विरोधात आहे २५%, कोणाच्याही जन्माचा हक्क नाकारता येत नाही २८.५%.
- **स्त्रीचा स्वतःच्या शरीरावर हक्क :** स्त्रीला स्वतःच्या शरीरावर हक्क असला पाहिजे तसेच गर्भपात हा केवळ तिच्याच मतानुसार व्हायला पाहिजे असे मत ७५% उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे.
- **दुसऱ्या गर्भधारणेचे वेळी सोनोग्राफी द्वारा तपासणी :** ८१% उत्तरदाते या चाचणीच्या विरोधी मत नोंदविणारे आहेत.
- **गर्भपाताचा निर्णय :** निर्णय घेण्यामागे सासरची व्यक्ती प्रामुख्याने जबाबदार असल्याचे दिसते. यात सर्वाधिक पती ४७% ची भूमिका अधिक आहे. त्या पाठोपाठ सासू ४३.५%, घरातील इतर सदस्य २७.५% व सासरे १८% यांचे प्रमाण दिसते.
- **गर्भलिंग निदान विरोधी कायदा व शिक्षेबद्दलची जागृती :** ६०% उत्तदात्यांना या कायद्याची जुजबी का होईना पण माहिती आहे. ग्रामीण भागातील ५५% उत्तरदात्यांपेक्षा शहरी उत्तरदात्यांमध्ये ही जागृती अधिक ६५% आहे. गर्भलिंग चाचणी केल्यास डॉक्टरांना जबाबदार धरुन शिक्षा व्हायला पाहिजे या मताचे ६३% उत्तरदाते आहेत. ग्रामीण ६१% व शहरी ६५% उत्तरदात्यांनी डॉक्टरांनाच प्रामुख्याने जबाबदार धरले आहे.

## *स्त्री भ्रुण हत्येचे परिणाम :*

- **कौटुंबिक परिणाम :** कुटुंबसंस्थेचे व पर्यायाने समाजात अधःपतन निर्माण होईल असे मत ५३% उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे. विवाह संस्थेला व कुटुंब संस्थेला तडा जाईल असे मत ४७.५% उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे.
- **स्त्री संबंधीत परिणाम :** स्त्री भ्रुण हत्येमुळे स्त्रियांची व मुलींची छेड-छाड मोठ्या प्रमाणावर वाढेल असे मत ५६% उत्तरदात्यांचे आहे. परमुलखातून स्त्रियांना विकत घेऊन बळजबरीने विवाह करण्याचे प्रमाण वाढेल असे मत ३५.५% उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे. स्त्रियांवरील बलात्काराचे प्रमाण वाढेल असे मत ४८% उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे. बलात्काराचे प्रमाण वाढल्यास एड्स व इतर असाध्य गुप्त रोगांचा प्रसार होईल असे ५३.५% उत्तरदात्यांचे मत आहे. स्त्री अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होईल असे मत ५३.५% उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे.
- **सामाजिक परिणाम :** ६३% उत्तरदात्यांच्या मते स्त्री भ्रुणहत्येमुळे मुलांच्या विवाहासाठी वधुंची कमतरता निर्माण होईल. लैंगिक गुन्हेगारांच्या टोळीत वाढ होईल असे मत ५१.५% उत्तरदात्यांचे आहे.

## *स्त्री भ्रूणहत्या रोखण्याकरीता उपाययोजना :*

आपली मुलगी आपण वाचवायची, ही जबाबदारी राज्यातल्या सगळ्यांनी स्वीकारली तरच घसरता लिंगदर आणि मुलींच्या जन्माचा गोंधळ थांबेल. स्त्री भ्रूणहत्या रोखण्याचे प्रयत्न व्यक्तीगत, संस्थागत, समुदाय व शासकीय अशा पातळीवर होणे आवश्यक आहे. सामुहिक प्रयत्नातून ही समस्या सोडविली जाऊ शकते. या समस्येची व्याप्ती व तिचे सामाजिक परिणाम लक्षात घेता समाजातील प्रत्येक घटकाने या समस्येबाबत जागृत होऊन वेळीच तिचे निमुर्लन करण्यास सहयोग करणे आवश्यक आहे. विविध पातळीवर केल्या जाऊ शकणाऱ्या उपाययोजना पुढील प्रमाणे.

रविंद्र रु. पं. यांनी समाजप्रबोधन पत्रिकेमध्ये भ्रूणहत्येला थांबविण्याच्या पुढील उपायांची चर्चा केली आहे.

- विषम लिंग गुणोत्तरविरोधी मागील मोहिमा व धोरणांमध्ये पुरुषांना स्थान नव्हते व ही त्यांच्यातील महत्वाची उणीव होती. मुलींच्या निःपाताचा मुद्दा हा 'स्त्रियांचा प्रश्न नसून' तो 'समाजाचा प्रश्न आहे' हे बिंबवणे गरजेचे आहे.
- दुर्लक्ष व भेदभावातून होणारी बालिकांची हत्या रोखणे ही या समस्या निवारणाची दुसरी बाजू आहे.

- डॉक्टरांची जबाबदारी : डॉक्टरांना दुहेरी नाही तिहेरी भूमिका वठवावी लागते. (एक) गर्भलिंग निदान तपासणी कधीच करायची नाही (दोन) असे काम करणाऱ्या आपल्या बंधू-भगिनींचे मतपरिवर्तन करावे लागते (तीन) मुलगा-मुलगी गर्भनिदान करुन द्या ही समाजातील प्रवृत्ती किंवा संबंधिताकडून होणारी मागणी टाळण्यासाठी पालक व त्यांचे नातेवाईक यांचे ब्रेन वॉशिंग करणे. यासाठी डॉक्टरांनी वेळ देणे.

  गर्भाचे लिंगनिदान करुन तो स्त्री-गर्भ असल्यास गर्भपात केल्याने भविष्यात जो भीषण सामाजिक असमतोल होऊ शकतो त्याची प्रकर्षाने जाणीव डॉक्टरांना असायला हवी. सर्व डॉक्टरांनी गर्भतपासणी आणि स्त्री भ्रुणहत्येशी संबंधित विचार व कृतीला ताबडतोब प्रतिबंध करावा अन्यथा पुढची पिढी भविष्यात निर्माण होणाऱ्या भीषण सामाजिक असमतोलाबद्दल डॉक्टरांना कधीच माफ करणार नाही.

  डॉक्टरांसारख्या समाजातील आदरणीय व्यक्तीमत्वाच्या अविचारामुळे समाजात अशी विचित्र परिस्थिती निर्माण व्हावी ही डॉक्टरांसाठी अतिशय शरमेची बाब आहे.

**शासनस्तरावरील उपाययोजना :**

स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी केंद्र सरकारने सुकन्या योजना मांडली होती. पंजाब, हरियाणा, उत्तरप्रदेश या राज्यांमध्ये ही योजना सुरु झाली आहे. या योजनेनुसार बीपीएल कुटुंबात मुलगी जन्माला आल्यानंतर तिच्या नावे सरकारतर्फे पाच हजार रुपये जमा करण्यात येतील. मुलीच्या अठराव्या वर्षानंतर तिला हे पाच हजार रुपये व्याजासह देण्यात येतील परंतु त्यासाठी अठरा वर्षापर्यंत मुलगी अविवाहित असणे आणि तिचे बारावीपर्यंतचे किमान शिक्षण असावे अशी अट घालण्यात येणार आहे.

गर्भलिंग तपासणी विरोधातील कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे करण्यात यावी. महिला व बालकल्याण मंत्रालय आणि महिला आयोगाकडे सदर कायद्याच्या अंमलबजावणीच्या देखरेखींचे काम दिले पाहिजे.

शासनाने स्त्री भ्रुणहत्या बंदीसाठी पूर्वी केलेल्या कायद्याचे पुन: परिक्षण करुन त्यातील उणीवा दूर करुन कठोर कायदे करावेत व त्यांची अंमलबजावणी करावी.

**सोनोग्राफी सेंटरवर नियंत्रण :**

- सोनोग्राफी सेंटर्स विरुध्दची तक्रार करण्यासाठी राज्याच्या आरोग्य खात्याने सातही दिवस चोवीस तास आपली दारे खुली ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ऑनलाईन सेवाही

उपलब्ध करुन देण्यात येणार असून त्यासाठी ‘आमची मुलगी’ ही वेबसाईट सुरु करण्यात आली आहे.

- सोनोग्राफी सेंटर्स विरोधातील तक्रार नोंदविता यावी, यासाठी आरोग्य खाते स्वतंत्र यंत्रणा उभारली आहे. त्या अंतर्गत ‘हेल्पलाईन’ ही सुरु करण्यात आली आहे.
- गर्भलिंग चाचणी विरोधात व्यापक मोहिम उभारणे चौफेर वाढणाऱ्या सोनोग्राफी सेंटर्सवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. ही केंद्रे रजिस्टर्ड आहेत काय? केंद्रात सरकारी प्रमाणपत्र ठळकपणे लावले आहे का? उपचारांचे ३ वर्षाचे रेकॉर्ड जतन केले आहे का? उपचारांसाठी प्रशिक्षित व अर्हताप्राप्त व्यक्तींची नेमणूक आहे का? गर्भलिंग निदानाला कायद्याने बंदी आहे असा बोर्ड लावला आहे का? या सर्व मुद्यांची दखल घेतली गेली पाहिजे.
- तज्ज्ञाव्यतिरिक्त इतर कोणालाही सोनोग्राफी मशिन खरेदी करण्यास बंदी घालावी. यापूर्वी तज्ज्ञ व्यक्तीव्यतिरिक्त ज्यांनी मशिन खरेदी केली असेल ती मशिन्स सरकारजमा करण्यात यावीत.
- या केंद्राची नियमित तपासणी व मूल्यमापन करण्याची जबाबदारी त्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात यावी. तपासणी अहवालाच्या आधारे त्या केंद्रावर कारवाईचे अधिकार या अधिकाऱ्यांना देण्यात यावेत.
- सोनाग्राफी सेंटर बाहेर ‘येथे गर्भलिंग चाचणी केली जात नाही’ असा मजकूर बोर्डवर लावणे बंधनकारक आहे. सोनोग्राफी करायला आलेल्या महिलेकडून ‘मी सोनोग्राफी करायला आले आहे मी गर्भलिंग चाचणी करणार नाही’ अशी लेखी कबुली महिलेच्या सहीसह घेऊन त्याची एक प्रत महिलेला द्यावी लागते. ‘मी गर्भलिंग समजले तरी सांगणार नाही’ असा डॉक्टरांचा त्यांच्या सहिचा कबुलीजबाब हवा पण हे सर्व नियम धाब्यावर बसवून सोनोग्राफी सेंटर्स चालविली जातात.

**कायद्यात्मक उपाययोजना :**

- **गर्भपात, कायदे, गर्भलिंग चाचणी कायदा :**

भारतामध्ये १७२ सालापासून गर्भपाताला कायद्याने मान्यता मिळाली. त्यानुसार जर स्त्रिच्या मानसिक अथवा शारीरिक आरोग्याला धोका होण्याची शक्यता असेल तर ती गर्भपात करुन घेऊ शकते. जर संततीप्रतिबंधक गोळ्या घेतल्यानंतरही गर्भ राहिला किंवा एखाद्या स्त्रिला बलात्कारापासून

दिवस गेले तर ती गर्भपात करुन घेऊ शकते. गर्भातील बाळ शारीरिक अथवा मानसिकदृष्ट्या व्यंग घेऊन जन्माला येणार असेल तर तो गर्भ काढून ती टाकू शकते. गर्भपात करीत असतांना त्याचे कारण आणि पुरावा यांची नोंद जपून ठेवणे बंधनकारक आहे.

जन्मदर कमी होण्याची प्रक्रिया १९७० च्या दशकातली 'गर्भजल परीक्षा' हे प्रसुतिपूर्व चाचणी तंत्र भारतात दाखल झाले. १९७२ साली गर्भपाताचा कायदा संमत झाला. गर्भजलपरीक्षेतून मुलाचे लिंगही कळत असे. त्यामुळे मुलीचा गर्भ असल्यास कायदेशीर गर्भपात करुन घेणे असे प्रकार थोड्या प्रमाणात सुरु झाले.

१९७६ साली भारत सरकारने या चाचण्यांवर बंदी आणली. पुढे १९८८ मध्ये महाराष्ट्रात पहिल्यांदा या बंदीला कायद्याचे स्वरुप मिळाले. पुढे इतर राज्यांनीही कायदे केले आणि १९९४ साली PNDT (Pre-natal Diagnostic Techniques Act) भारतभर कायदा लागू झाला.

१९८८ सालच्या कायद्याचा फारसा परिणाम दिसला नाही. जनगणनेतील आकडेवारीतून आपल्याला ०-६ वर्षे या वयोगटाच्या मुलांची व मुलींची संख्या मिळते. हे लिंग-गुणोत्तर निसर्ग नियमानुसार ९४० च्या आसपास असायला हवे. १९९१ च्या जनगणनेतील आकड्यांवरुन काही राज्यांसाठी हे गुणोत्तर ९०० च्या खाली गेले होते. १९९४ साली भारत सरकारने हा कायदा देशभर लागू केला. २००१ च्या जनगणनेत सुध्दा मुलींची संख्या खूपच कमी झाल्याचे निदर्शनास आले.

१९८८ साली झालेल्या या कायद्याचा २००३ पर्यंत फारसा वापर झालाच नाही. २००३ साली या कायद्यात सुधारणा करुन 'गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र' हा कायदा आला. लिंगनिदान झाल्याचे आढळून आल्यास डॉक्टरांसाठी दंडाची व शिक्षेची तरतूद करण्यात आली. १०००० रुपये दंड व ३ वर्षे सक्त कारावास अशी ही शिक्षा होती.

- या प्रश्नावर खऱ्या अर्थाने तोडगा काढायचा असेल तर हुंडाबंदी द्विभार्या प्रतिबंधक कायदा व बालविवाह प्रतिबंधक कायदा यांची काटेकोर प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवी. पहिल्या बायकोला टाकून देऊन दुसरे लग्न केले जाते त्यामध्ये मूल नसणे किंवा मुलगा नसणे हे मोठे कारण असल्याचे आपण पाहतो.
- लिंगनिवडीस कायद्याने बंदी : गर्भलिंगनिदान तंत्राचा दुरुपयोग होऊन, लिंगनिदान करुन मुलींचा गर्भ असल्यास तो नाहीसा केला जातो. या प्रकाराला आळा बसावा व त्याद्वारे समाजातील स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोल दूर व्हावा, या उद्देशाने सरकारने गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४ साली प्रथम महाराष्ट्रामध्ये

अस्तित्वात आणला. त्यानंतर केंद्र शासनाने याच कायद्यास सुधारित रुप देऊन भारतामध्ये तो लागू केला. प्रत्यक्षात हा कायदा १४ फेब्रुवारी २००३ पासून अंमलात आला. त्यानुसार जिल्ह्यातील स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी जिल्हास्तरीय सल्लागार समित्या स्थापन करण्यात आल्या. गर्भलिंग तपासणी व गर्भलिंग निश्चिती यावर बंदी आणणे हा कायद्याचा उद्देश आहे हे समाजापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

- कायद्याचा बडगा आवश्यक : गर्भधारणापूर्व व प्रसवगपूर्व निदानतंत्र अधिनियम २००३ नुसार स्त्री भ्रुणहत्या थांबविण्यासाठी जागजागृती बरोबरच कायद्याचा बडगाही आवश्यक आहे. उदा
  - लिंगनिवड करणाऱ्यास रु. १०००० दंड व तीन वर्षे कारावासाच्या शिक्षेची तरतूद.
  - गुन्हा सिध्द झाल्यास संबंधित वैद्यकीय व्यावसायिककाची नोंदणी दोन वर्षासाठी आणि पुनरावृत्ती आणि झाल्यास कायमस्वरुपी रद्द करण्याची तरतूद.
  - पुनरावृत्ती झाल्यास रु. ५०००० दंड व पाच वर्षे कारावासाची शिक्षा.
  - गरोदर महिलेस जबरदस्तीने गर्भलिंग चिकित्सा तपासणी करण्यात भाग पाडणारा नवरा, नातेवाईक यांना उचित कायद्यानुसार शिक्षेची तरतुद इ.
- ज्या ग्रामीण रुग्णालयाच्या हद्दीत किंवा शहरातील वार्डात मुलींची संख्या प्रमाणापेक्षा अधिक घटताना दिसते आहे तेथील पीसीपीएनटीडी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांस वैयक्तिकरित्या जबाबदार धरुन अशावर कारवाई करण्यात यावी.
- अशा भागाला जोखमीचे क्षेत्र जाहीर करुन त्या भागातील सर्व सोनोग्राफी मशिन्स शासनाने जनहितार्थ ताब्यात घ्यावीत. फक्त सरकारी रुग्णालयात अशी मशिन्स जनतेची गैरसोय टाळण्यासाठी उपलब्ध करावीत.
- एक किंवा दोन मुली असणाऱ्या गरोदर मातांच्या मदतीने गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टरांचा शोध घेऊन अशा डॉक्टरांवर कारवाई करावी.
- आएमए स्त्री रोगतज्ज्ञांची संघटना आणि रेडिऑलॉजिस्टची संघटना यांना ‘पीसीपीएनडीटी’ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार धरण्यात यावे.
- राज्य पर्यवेक्षकीय समितीत जोखमीच्या १४ जिल्ह्यातील स्वंयसेवी संघटनांच्या सक्रिय प्रतिनिधीला सदस्यत्व देण्यात यावे.
- जिल्हा सल्लागार समित्यांची फेररचना करण्यात यावी.

**लिंगभाव समानता रुजविण्याचे उपाय :**

- दुय्यमत्व भावनेने स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. त्यासाठी समाजातील व्यक्तींचे मोठ्या प्रमाणात प्रबोधन झाले पाहिजे.
- स्त्री भ्रुण हत्येमुळे पुढील काळात समाजावर होणाऱ्या वाईट परिणामांचा टी. व्ही., रेडिओ, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालीके या प्रसारमाध्यमांद्वारे प्रचार झाला पाहिजे.
- लिंगभेद विरहित शिक्षणव्यवस्थेत स्त्री पुरुष समानतेचे मूल्य समाजात रुजविले पाहिजे.
- हुंडाप्रथेला आळा घालण्यासाठी कायदेयंत्रणा शासन व समाज यांनी कठोर पावले उचलली पाहिजेत.
- स्त्री भ्रुण हत्या करणाऱ्या मातापित्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे.
- समाजामध्ये स्त्री भ्रुण हत्येला विरोध करणारे सामाजिक दबावगट तयार झाले पाहिजेत त्यासाठी लोकांमध्ये याविषयीच्या संदर्भात जाणीव जागृती निर्माण झाली पाहिजे.
- स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी देशातील सर्व स्त्री चळवळींनी आग्रही भूमिका घेऊन एक मोठे आंदोलन उभे करावे.
- सर्वात महत्वाचे म्हणजे आईने स्वतःच्या मुलीला मारु इच्छिणाऱ्या व्यक्तींना विरोध केला पाहिजे.

**जाणीवजागृती :**

- स्त्रियांच्या संख्येचे प्रमाण सतत घसरत राहिले तर समाजावर काय परिणाम होईल याची जाणीव करुन देण्यासाठी पुरुषप्रधान समाजात पुरुषांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. स्त्रीविषयी मानसिकता बदलायला हवी.
- मुलगीच वंशाचा दिवा ही मानसिकता दूर करणे : ‘जर पणतीऐवजी दिवा पाहिजे वंशाला तर मुलाच्या लग्नाला मुलगी हवी कशाला’ हा प्रश्न समाजाला विचारुन, मुलाशिवाय मोक्षप्राप्ती नाही ही विचारसरणी बदलून कुटुंबात मुलीच्या जन्माचे स्वागत करुन, मुली जन्मल्यानंतर पेढे वाटून आनंद व्यक्त करण्याची समाजाची मानसिकता निर्माण करणे, मुली सासरी व माहेरी दोन्हीकडे प्रकाश देतात हे पटविणे गरजेचे आहे.
- लेक लाडकी अभियान राबविणे : दलित महिला विकास मंडळाच्या माध्यमातून स्त्री भ्रुणहत्येचे गांभीर्य ओळखून गर्भलिंगनिदान करणाऱ्या व्यवस्थेवर (सेंटर्सवर) छापे टाकून दुष्कृत्ये करणाऱ्यांचे पितळ उघडे करणाऱ्या वर्षा देशपांडे यांनी लेक लाडकी अभियान

यशस्वीपणे राबविले आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी व आपल्या भागात अशा प्रकारचे अभियान राबविण्यासाठी सक्रीय सहभाग दिला जावा.

- बालदिन साजरा करणे : १४ नोव्हेंबर हा बालदिन वेगळ्या पध्दतीने साजरा करणे. या बालदिनादिवशी जन्म घेतलेल्या प्रत्येक मुलीचे व तिच्या मातेचे हार्दिक स्वागत करणे.
- समाज प्रबोधन करणे : मुलगा-मुलगी भेदभाव नष्ट करण्यासाठी समाजात मुलींच्याविषयी आस्था निर्माण करणे. पुरातन काळातील स्त्रिया झाशीची राणी लक्ष्मीबाई, चाँदबीबी, जिजामाता, अलीकडच्या काळातील इंदिरा गांधी, विजयालक्ष्मी पंडीत, मदर तेरेसा, वर्तमान काळातील किरण बेदी, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स, सानिया मिर्झा, राष्ट्रपती मा. प्रतिभाताई पाटील या सर्व महिलांच्या कर्तृत्वाचा सुगंध दाहीदिशा व्यापून राहिला आहे. मुलीला शिक्षण देऊन अचूक दिशेने भरारी मारण्यासाठी तिच्या पंखात बाळ भरण्याचे काम तिच्या आई-बाबांनी व कुटुंबियांनी करण्याचे आहे हे पटवून देणे. स्त्रीशिवाय वंशवेल फुलेल, बहरेल काय? पटवून देणे आवश्यक आहे.
- युवक-युवतींमध्ये जागृती निर्माण करणे : भारत हा देश जगात सर्वात जास्त तरुणांची संख्या असलेला देश म्हणून नजीकच्या काळात ओळखला जाणार आहे. या तरुणांमध्ये घरातून, शाळा / कॉलेजमधून नुसते मुलगी चालेल म्हणण्याऐवजी मुलगीच हवी अशी प्रेरणा निर्माण करणे, मुलींच्याबद्दलच्या समाजाच्या मानसिकतेत बदल करणे, आपण जिच्यापोटी जन्म घेतो ती आई प्रथम मुलगीच असते हे श्रेष्ठतत्व सांगणे.
- सकारात्मक संदेश समाजाला देणे : सध्या महाराष्ट्रात स्त्री भ्रुणहत्या थांबवा असा नकारात्मक संदेश देण्याऐवजी स्त्री जन्माचे वा मुलीच्या जन्माचे स्वागत करा असा सकारात्मक संदेश नगर, नाशिक जिल्ह्यामध्ये दिला जात आहे. शासन, स्वंयसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामसभा या विविध कार्यक्रमातून स्त्री जन्माचे स्वागत करणारी चळवळ डॉ. सुधा काकरिया यांच्या पुढाकाराने होत आहे. गावागावात जसे संत गाडगेबाबा महाराज स्वच्छता अभियान, तंटामुक्त गाव अभियान राबविले जाते त्याचप्रमाणे स्त्री भ्रुणहत्याबाबत गाव अभियानही राबवावे. त्यासाठी बक्षिसे ठेवावीत. 'वंशाचा दिवा असो वा पणती घरोघरी प्रकाश देती' 'स्त्री शक्तीची थोरवी स्मरु, म्हणूनच मुलीच्या जन्माचे स्वागत करु' 'मुलीचाच करा विचार ती तर देते वृध्दापकाळी आधार' असे सकारात्मक संदेश समाजाला देऊन त्यांच्या मानसिकतेत बदल घडवून आणणे गरजेचे आहे.

- गर्भलिंग निदान विरोधी अभियान जबाबदारीने यशस्वी करण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन समाजात रुजविणे. हे अभियान लिंगभाव समानता रुजवून विषमता विरोधी असले पाहिजे. या अभियानाची भाषासुध्दा गर्भपात विरोधी नसावी. आपण बरीच सरकारी पोस्टर्स बघतो ज्यात गरोदर बाईशी तिच्या पोटातील मुलगी बोलत असते. मला मारु नको गं आई असे जेव्हा गर्भ बोलतो तेव्हा ते गर्भपात विरोधी पोस्टर होते. विषमता विरोधी नाही. तसेच आईवर जबाबदारी टाकणारे हे विधान कुटुंबातील पुरुषांना मोकळे सोडते. अभियानामध्ये आपण भाषा विचारपुर्वक वापरायला हवी.
- कुटुंब, समाज व सरकार सर्वानीच बालिकांच्या आरोग्यविषयक प्रश्नांना प्राधान्य द्यायला हवे. ज्या योगे ० ते ६ वर्षापर्यंतच्या वयोगटातील बालिकाच्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येईल.

**सामाजिक उपाययोजना :**

- मुलगा हवा तोच आपले अंत्यसंस्कार करेल ही लोकांची भावना असते पण असे मानण्याची गरज नाही. सुनेने, मुलांनी, मुलींनी नातवंडांनी किंवा मित्र मैत्रिणीनी अंत्यसंस्कार केले तरी चालेल अशी समाजाची मानसिकता व्हायला हवी.
- अनेक दिवस चालणारे लग्न समारंभ लाखो रुपयांची उधळपट्टी हे बंद करायला हवे. कारण यामध्ये मुलीच्या कुटुंबावर प्रचंड भार पडतो. लग्नात खर्च करायचा की नाही हे मुलासाठी ऐच्छिक असते. मुलीच्या कुटुंबाबाबत मात्र ती सक्ती असते. लग्नावर होणारी उधळपट्टी थांबवण्यासाठी कायद्याची आणि प्रामुख्याने मानसिकता बदलण्याची गरज आहे.
- प्रत्येक क्षेत्रात पुरुष आणि स्त्रियांसाठी समान संधी आणि समानता आणण्याचा प्रयत्न आपण एकत्रितपणे करायला पाहिजे.

**डॉक्टरांनी करावयाचे प्रयत्न :**

- वैद्यकशास्त्रातील नितीमूल्यांना काही डॉक्टर्स पैशाच्या लोभाने तिलांजली देत असतील व कायद्याचे उल्लंघन करत असतील तर डॉक्टरांच्या संघटनांनी आणि विशेषतः महिला डॉक्टर्सनी त्यांच्या विरोधात आवाज उठवला पाहिजे.
- गर्भलिंग स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी इंडियन मेडीकल असोशिएशन (आय. एम. ए.) सारख्या डॉक्टरांच्या संघटनांनी भ्रूणहत्या विरोधात मोठ्या प्रमाणावर मोहिम उघडली आहे. ही मोहिम राबविण्याचे सातत्य या संघटनेकडून राखले पाहिजे. वर्धा जिल्हा गर्भलिंग तपासणी विरोधी मोहिमेत नेहमीच अग्रेसर आहे. वर्ध्यात कुठल्याही डॉक्टर सोनोग्राफीद्वारे गर्भलिंग

तपासणी करीत नाही याची हमी आय. एम. ए. वर्धा देत आहे तसेच असे गैरप्रकार टाळण्यासाठी जो व्यक्ती वर्ध्यात गर्भलिंग तपासणी होत असल्याचा सबळ पुरावा देईल त्या व्यक्तीला असोशिएशन तर्फे रोख रुपये २५ हजार रुपये बक्षिस देण्यात येईल व माहिती देणाऱ्यांची ओळख गुप्त ठेवण्यात येईल असे गैरप्रकार आढळल्यास संपर्क साधावा असे आव्हानच वर्धा आय. एम. ए. ने केले आहे.

**सामाजिक संस्थांचा पुढाकार :**

स्वंयसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, लोकसहभाग यातून शासनाचे जे स्तुत्य उपक्रम आहेत उदा. मुलगी जन्मल्यानंतर तिच्या नावावर रु. ७०००, अठराव्या वर्षी आणखी बचत, जन्मताच तिचा रु. १००००० चा विमा उतरविणे, दहावीपर्यंतचे मोफत शिक्षण हे समाजातील लोकापर्यंत पोहचविणे व त्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

**वकीलांनी करावयाचे प्रयत्न :**

- वकिली क्षेत्रातील व्यावसायिकांनी विशेषतः महिला वकिलांनी गर्भलिंग चाचणी कायद्यातील सर्व पळवाटांचा सखोल अभ्यास करुन त्या बंद करण्यासाठी आपली बुध्दीपणाला लावली पाहिजे.
- न्यायालयात या संदर्भातील दाखल खटल्यातील जेवढ्या प्रकरणी शासनाला अपयश आले त्या सर्व प्रकरणांचे तज्ज्ञांकरवी मूल्यमापन करण्यात यावे आणि या अपयशाला सरकारी वकील आणि तक्रारदार जबाबदार आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.
- या प्रकरणी सरकार पक्षाचे साक्षीदार, फितूर झालेले आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत आणि न्यायालयाचा दृष्टिकोन दूषित आहे असे आढळल्यास उच्च न्यायालयांकडून अशा प्रकरणांची चौकशी करण्यात यावी.